आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

११ जून २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राज्यात चांगल्या पावसाच्या अंदाजाच्या अनुषंगानं खरीप हंगामाचं नियोजन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे कृषी विभागाला निर्देश
- पुढच्या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोनदा प्रवेश प्रक्रिया राबवायला विद्यापीठ अनुदान आयोगाची परवानगी
- नीट परीक्षाप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस, मात्र परीक्षेनंतरच्या काउन्सिलिंग प्रक्रीयेला स्थगिती द्यायला नकार

**आणि**

- आषाढी यात्रेनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी एसटी महामंडळ ५ हजार विशेष गाड्या सोडणार

<><><><><>

राज्यात यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला आहे आणि त्या दृष्टीनं कृषी विभागानं खरीप हंगामाचं नियोजन करावं, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. राज्यातली पाण्याची उपलब्धता आणि पर्जन्यमानाबाबतची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते.

शेतकऱ्यांना बियाणं, खतांची टंचाई जाणवणार नाही, याची काळजी घ्यावी. बियाण्यांचा काळाबाजार आणि बनावट बियाण्याची विक्री

रोखण्यासाठी कृषी विभागानं धडक कारवाई करावी, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पाणीटंचाई असलेल्या भागांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करणं आणि चारा छावण्या उभारण्याला जिल्हा प्रशासनानं प्राधान्य द्यावं.

आपत्तीच्या काळात नागरिकांना वेळेवर मदत पोहोचवण्याच्या दृष्टीनं सर्व विभागांनी समन्वयानं काम करावं, असंही त्यांनी नमूद केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

पुढच्या शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांना वर्षातून दोनदा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची मुभा देण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगानं घेतला आहे. निकालांना उशीर, आरोग्य समस्या किंवा वैयक्तिक कारणांमुळे प्रवेश चुकलेल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पूर्ण एक वर्ष प्रतीक्षा करावी लागणार नाही. सध्याच्या नियमानुसार एका वर्षात एका शैक्षणिक सत्रात प्रवेश मिळतो.

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत यंदा काही गैरप्रकार झाल्याचा आरोप करत, त्याच्या चौकशीची आणि पूर्ण परीक्षा प्रक्रीयाच रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या सुट्टीकालीन पीठानं त्यावर राष्ट्रीय चाचणी

संस्थेला नोटीस बजावली असून पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला ठेवली आहे. मात्र परीक्षेनंतरच्या काउन्सिलिंग प्रक्रीयेला स्थगिती द्यायला न्यायालयानं नकार दिला. अशाच आशयाच्या याचिका कोलकाता आणि दिल्ली उच्च न्यायालयातही दाखल झाल्या आहेत.

**<><><><><>**

केंद्रातल्या नव्या मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झाल्यानंतर आज नवनियुक्त मंत्र्यांनी आपापल्या खात्यांचा कार्यभार स्वीकारला. राजनाथ सिंह यांनी संरक्षण, अमित शहा यांनी गृह, डॉ. एस. जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची सूत्रं हाती घेतली. जे. पी. नड्डा यांनी आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री म्हणून, तर प्रतापराव जाधव यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. रामदास आठवले यांनी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण मंत्री म्हणून, तर डॉ. एल. मुरुगन यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून सूत्रं हाती घेतली.

शिवराज सिंह चौहान यांनी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचा, तर गजेंद्र सिंह शेखावत यांनी सांस्कृतिक मंत्रालयाचा पदभार स्वीकारला. ज्योतिरादित्य शिंदे यांनी दूरसंवाद मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. रक्षा खडसे यांनीही क्रीडा राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्विकारला. हरदीप सिंह पुरी यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री म्हणून, तर सुरेश गोपी यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून, पदाचा कार्यभार स्विकारला तसंच किरेन

रिजिजू यांनी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक मंत्री म्हणून, तर मनोहर लाल यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री म्हणून कार्यभार स्विकारला.

**<><><><><>**

राज्यात येत्या २६ तारखेला होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीसाठी मतदानाची वेळ निवडणूक आयोगानं वाढवून दिली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक, आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरता ही निवडणूक होत आहे. त्यासाठी या मतदानाची वेळ वाढवण्याची मागणी काही संघटनांनी केली होती, ती निवडणूक आयोगानं मान्य केली आहे. त्यानुसार आता मतदानाची वेळ सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत असेल, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. मतमोजणी १ जुलैला होणार आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं परस्पर उमेदवार जाहीर केले असून उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. ही निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढण्याची काँग्रेसची इच्छा आहे; असं झालं तर लोकसभेसारखं यश मिळू शकतं असंही पटोले म्हणाले. अर्ज मागं घ्यायला वेळ असून याबाबत लवकरच निर्णय होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, 'नीट' परीक्षा भ्रष्टाचाराचं केंद्र बनलं असून परीक्षेतल्या घोटाळ्याची सीबीआय चौकशी करण्याची मागणी पटोले यांनी केली आहे.

**<><><><><>**

साने गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केलं आहे.

**<><><><><>**

आषाढी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपुरला जाणाऱ्या भाविकांसाठी यात्राकाळात ५ हजार विशेष बस सोडण्याचं नियोजन एसटी महामंडळानं केलं आहे. विशेष म्हणजे यंदा राज्यातल्या कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा, असं आवाहन एसटी महामंडळानं केलं आहे.

या प्रवासात देखील ७५ वर्षावरच्या ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनानं दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत.

फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी आणि अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत, तसंच यात्रा कालावधीत पंढरपूर इथं चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) आणि विठ्ठल कारखाना यात्रास्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानकं उभारण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

राज्यात बहुतांश भागात पावसाला सुरुवात झाली असून मागील काहीं दिवसापासून पडत असलेल्या पावसामुळे **धाराशिव** जिल्ह्यात आजपर्यंत सरासरी १२३ पूर्णांक १ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. आज सकाळपर्यंत धाराशिव तालुक्यातल्या ढोकी आणि जागजी, तुळजापूर तालुक्यातल्या सलगरा आणि ईटकळ, कळंब तालुक्यातल्या शिराढोण आणि गोविंदपुर, उमरगा तालुक्यातल्या नारंगवाडी आणि मुळज या जिल्ह्यातल्या आठ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. गेल्या २४ तासांत ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**लातूर** जिल्ह्यातल्या लातूर, औसा, निलंगा, चाकूर, रेणापूर, शिरूर, अनंतपाळ या ६ तालुक्यात गेल्या २४ तासांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. लातूर जिल्ह्यात आतापर्यंत १३५ पूर्णांक ८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून प्रादेशिक हवामान विभागानं जिल्ह्यात उद्यापर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे.

**बीड** जिल्ह्यात आंबेजोगाई, घाट नांदूर, परळी वैजनाथ, धारूर या ४ महसुली मंडळात अतीवृष्टीची नोंद झाली आहे.

**सांगली** जिल्ह्यातही तासगाव, कवठेमंकाळ आणि पलूस तालुक्यात मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला.

**अकोल्यात** साडेचार वाजल्यापासून पावसानं दमदार हजेरी लावली आहे. अकोला जिल्ह्यात येत्या चार-पाच दिवसांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यादरम्यान ताशी ४० ते ५० किलो मीटर वेगानं वारे वाहतील, असा इशारा नागपूर हवामान विभागानं दिला आहे.

**बुलडाणा** जिल्ह्यातही वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात पळशी, आसलगाव इथं ढगफुटी सदृश पाऊस झाला. अनेक नागरिकांच्या घरात पावसाचं पाणी शिरलं. खामगाव तालुक्यात अंबिकापूर इथं वीज पडल्यानं २ बैल ठार झाले.

**<><><><><>**

डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या पुरुष कनिष्ठ गट विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताला देण्यात आलं आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानं आज स्वित्झर्लंड मध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला. यंदा या स्पर्धेत २४ संघ भाग घेणार आहेत.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज पाकिस्तान आणि कॅनडा यांचा सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस आज राज्याच्या आणखी काही भागात पोचला. गेल्या चोवीस तासात मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, कोकणात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मुसळधार, तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. कोकणातही जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//